# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 11 June 2025

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जून २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

बँकांच्या ठेवी, लाभांश, शेअर्स यामध्ये गुंतवणूक केलेल्या पण दावा न केलेल्या ठेवी पात्र गुंतवणूकदारांना देण्यासाठी वेगवान प्रक्रिया राबवण्याचे आदेश केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिले आहेत. आर्थिक स्थिरता आणि विकास परिषदेच्या बैठकीत त्या मुंबईत बोलत होत्या. विविध वित्तीय संस्थांनी यासाठी एकत्रित प्रयत्न करावे आणि जिल्हापातळीवर मेळावे घ्यावे, असं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्रात KYC प्रक्रिया सुलभ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

****

भालदार, चोपदार, टाळकरी, मानाच्या दिंड्यांसह हजारो वारकऱ्यांच्या जयघोषात संत निवृत्तीनाथांची वारी काल त्र्यंबकेश्वर इथून पंढरपूरच्या दिशेने रवाना झाली. आषाढी वारीनिमित्त संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी सोहळ्यासाठी त्र्यंबकेश्वरमध्ये मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. निवृत्तीनाथ संस्थानच्या वतीने मानाच्या दिंड्यांचा सत्कार करण्यात आला. नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉक्टर श्रीया देवचके यांनी निवृत्तीनाथांच्या मूर्तीस कुशाव्रत तीर्थावर स्नान घालून पूजा, अभिषेक केला. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनीही पालखी प्रस्थान सोहळ्याला भेट दिली. दरम्यान, आषाढी शुद्ध एकादशी यात्रेच्या २६ जून ते १० जुलै या कालावधीत भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व होडी मालक आणि चालकांनी होड्याची नोंदणी करावी असे निर्देश सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिले आहेत. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर इथे यासंदर्भात आयोजित बैठकीत काल ते बोलत होते. नोंदणी नसणाऱ्या होडी मालकांना आणि चालकांना चंद्रभागा नदी पात्रात जलप्रवास वाहतुकीसाठी परवानगी दिली जाणार नाही. तसंच प्रवाशांची संपूर्ण सुरक्षितता

बाळगत होडीतील प्रवासी संख्या देखील आसन क्षमतेनुसार राहणार असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २६ च्या वर्धापन दिनाचा भव्य कार्यक्रम काल पुण्यात बालेवाडी इथे पार पडला.

महाराष्ट्राचा विकास हाच यापुढे राष्ट्रवादी काँग्रेसचा अजेंडा राहणार आहे. याअगोदरही राज्य आणि देशासाठी काम करत होतो आणि यापुढेही करत राहू, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानेही पुण्यात पक्षाचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत बालगंधर्व मंदिरात वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम घेतला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर राज्याला नवीन नेतृत्व देऊ असं खासदार शरद पवार यावेळी म्हणाले.

****

धाराशिव इथे काल तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांच्या हस्ते महसूल पुस्तकालयाचं उद्घाटन करण्यात आलं. हे महसूल पुस्तकालय अधिकारी-कर्मचाऱ्यांना विविध शासन नियम, परिपत्रकं, अधिनियम, न्यायालयीन निर्णय आदींचा सखोल अभ्यास करता यावा आणि त्याचा उपयोग त्यांच्या कार्यामध्ये प्रभावीपणे करता यावा यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

****

भांडवली बाजारातून निधी उभारणारी पिंपरी-चिंचवड ही देशातील पहिली महापालिका ठरल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. मुंबई शेअर बाजाराच्या आंतरराष्ट्रीय सभागृहात पिंपरी-चिंचवड महापालिकेचा हरित कर्जरोख्यांना सूचित करायचा कार्यक्रम काल पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित होते. या हरित कर्ज रोख्यांद्वारे महापालिकेने 200 कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारला आहे.

****

राज्यात पंधरा जूननंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे. काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातलं पीकपाणी, पेरण्या, खतपुरवठा याबाबत माहिती दिली.

राज्यातल्या सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्क्यापेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्क्याहून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातल्या विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, मोसमी पाऊस येत्या तीन-चार दिवसांत राज्यात पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. कुलाबा वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी कालच्या बैठकीत ही माहिती दिली. मध्य महाराष्ट्रात बारा जूनला, तर मराठवाड्याच्या काही भागात बारा ते चौदा जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं, भुते यांनी सांगितलं.

मंत्रिमंडळानं या बैठकीत राज्यातल्या धरणांमधल्या उपलब्ध पाणी साठ्याचा आढावा घेतला. राज्यातल्या सर्व प्रमुख धरणांमधे गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी यावेळी दिली.

****